# संपादकीय

## मुलांनो मैदानात या...

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिति उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

## पानगावात गुरूवारी गौरव गुणवंतांचा कार्यक्रम

**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.१९, पानगाव (रेणापूर) :** काँग्रेस पक्ष पानगाव शहर द्वारा माध्यमिक शालांत परिक्षा २०२५ मध्ये यशाच्या उत्तुंग शिखराला गवसणी घालणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणवंत गौरव कार्यक्रम दि.२२ मे २०२५ रोजी गुरुवार सकाळी ठिक १०:०० वा. साईकृपा मंगल कार्यालय, पानगाव येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष सभापती, कृ. उ. बा. रेणापूर तथा चेअरमन, रघुकूल अर्बन निधी, पानगाव चंद्रचूड चव्हाण, प्रमुख मार्गदर्शक लेखक, समीक्षक, मराठी विभाग प्रमुख, सुशिलादेवी देशमुख महाविद्यालये प्रा.डॉ. शंकरानंद येडले, प्रमुख पाहुण उमाकांत खलंग्रे (सभापती, कृ. उ.बा. रेणापूर), गंगाधर आरडले (अध्यक्ष, माऊली विद्यार्थी विकास केंद्र, पानगाव), किरणभैय्या चव्हाण (अध्यक्ष, छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, पानगाव.), गयाबाई कसपटे (सरपंच. पानगाव), श्रीनिवास सोळंके (व्यवस्थापक, जना बँक, लातूर), शिवाजीराव आचार्य (उपसरपंच, पानगाव तथा संचालक, कृ.उ.बा. रेणापूर.), तुकाराम पाटील (संचालक, कृ.उ.बा.रेणापूर) आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, युवक- युवतीने उपस्थितीत राहवे. असे अवाहन काँग्रेस पक्ष पानगाव शहर पदाधिकारी, चंद्रचूड चव्हाण मित्र मंडळ पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी केले आहे.

# जगद्गुरू संत तुकारामांचे गुरुवर्य!

गुरुपरंपरा- वेदव्यास, राघवचैतन्य, केशवचैतन्य अशी होती, असे कळते. तुकारामांना केशवचैतन्यांचे प्रत्यक्ष दर्शन घडले नाही, तर स्वप्नात त्यांना दृष्टांत झाला. याला प्रमाण म्हणून तुकारामांचा पुढील अभंग सांगितला जातो –

**सदगुरूराये कृपा केली मज।**
**परी नाही घडली सेवा काही ।।धृ।।**
**सापडविले वाटे जाता गंगास्नाना।**
**मस्तकी तो जाणा ठेविला कर।।१।।**
**भोजना मागती तूप पावशेर।**
**पडला विसर स्वप्नामाजी।।२।।**
**राघवचैतन्य केशवचैतन्य।**
**सांगितली खूण मालिकेची।।३।।**
**बाबाजी आपुले सांगितले नाम।**
**मंत्र दिला रामकृष्णहरी ।।४।।**
**माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार।**
**केला अंगीकार तुका म्हणे।।५।।**

केशव चैतन्य- बाबाजी चैतन्य हे संत तुकारामांचे गुरू मानले जातात. त्याचे मूळ नाव विश्वनाथ. जन्म पुनवाडी किंवा पुणेवाडी- पुणे



येथील आहे. पित्याचे नाव नृसिंह आईचे नाव आनंदी होते. उपनाम राजर्षी किंवा राजऋषी होते. गिरिजा नामक स्त्रीशी त्यांचा विवाह झाला होता. त्याशिवाय त्यांच्यावर मोहित झालेल्या झबुन्नीसा आणि रोशन या यवन स्त्रियांचाही त्यांनी भार्या म्हणून स्वीकार केला होता. पुढे आलेल्या एका आपत्तीत झबुन्निसा आणि रोशन यांना मरण आले व गिरिजेसह ते ओतुर जि.पुणे येथे आले. तेथे राघव चैतन्य या सत्पुरुषाची गाठ पडून विश्वानाथांनी त्यांचे शिष्यत्व पतकरले आणि संन्यास घेतला. केशव चैतन्य हे त्यांचे संन्यास धर्मातील नाव होय. त्यांची समाधी ओतूर येथेच आहे. कृष्णदास बैरागीकृत चैतन्यलीला या अप्रकाशित ग्रंथात केशव चैतन्याने पुढील पाच ग्रंथ लिहिल्याचे म्हटले आहे- भक्तिप्रकाश, वैकुंठपद, वासनामय देह, गीताभागवतसार आणि परमार्थविचार तथापि ते सर्व अनुपलब्ध आहेत. त्यांच्या नावावर असलेले एक पद आढळते. त्यात-

नवविधा भक्ति निरंतर करवावी।
केशव चैतन्य शरण तुला रे।। अशी ओळ आहे. तथापि तीत उल्लेखिलेला केशव चैतन्य हाच होय, असे मानण्यास पुरावा नाही. केशव चैतन्याने अनेक अद्भुत चमत्कार केल्याच्या आख्यायिका आहेत. तुकाराम महाराजांचे गुरू बाबाजी चैतन्य आणि केशव चैतन्य हे एकच होत, असे काही विद्वान मानतात. तथापि बाबाजी चैतन्य हा त्यांचा शिष्य होता, असे काही विद्वानांनी निदर्शनास आणून दिले आहे. त्यांची समाधी ओतूर येथे असून त्यांचा समाधिकाल सन १५७१ साली २० मे असावा, असेही सांगितले जाते. समाधी स्थानाच्या शेजारी मांडवी नदीचा प्रवाह वाहतो.

**!! बाबा चैतन्य महाराजांना त्यांच्या समाधी दिनी कोटी कोटी विनम्र अभिवादन !!**

– संकलन व सुलेखन –
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप– ९४२३७१४८८३.

## ११ वी प्रवेश प्रक्रिया सुरू

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१९, ठाणे :** राज्यस्तरीय केंद्रीयकृत ११वी प्रवेश प्रक्रिया (शैक्षणिक वर्ष २०२५–२६) सुरू झाली असून, ठाणे जिल्ह्यातील ४५४ कनिष्ठ महाविद्यालये यामध्ये सहभागी झाली आहेत. सर्व विद्यार्थी आणि पालकांनी वेळापत्रकानुसार ऑनलाईन नोंदणी व प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहितुले यांनी केले आहे.

**फेरी क्र.१ चे तपशीलवार वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे :**

दिनांक तपशील १९ – २० मे सराव सत्र (प्रॅक्टिस सेशन) – विद्यार्थ्यांसाठी पोर्टलवर २१ – २८ मे प्रत्यक्ष नोंदणी व महाविद्यालय पसंतीक्रम भरणे (१ ते १० पर्यंत), ३० मे तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर ३० मे – १ जून हरकती व दुरुस्ती प्रक्रिया. ३ जून अंतिम गुणवत्ता यादी जाहीर, ५ जून गुणवत्तायादीवर आधारित प्रवेश वाटप (शून्य फेरी), ६ जून वाटप केलेल्या महाविद्यालयांची यादी पोर्टलवर प्रसिद्ध ६ – १२ जून Proceed for Admission पर्यायाद्वारे प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे १४ जून दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांची यादी जाहीर. प्रवेश प्रक्रिया पूर्ण करताना विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्रांची स्कॅन प्रत अपलोड करणे आणि संबंधित महाविद्यालयात प्रत्यक्ष हजर राहून कागदपत्रांची पडताळणी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी प्रथम पसंती मिळाल्यास तिथेच प्रवेश घेणे अनिवार्य राहील.

## कुटुंब..

एकत्र आणा पुन्हा
दुभंगलेले जे कुटूंब
परिवार हो एकसंघ
इच्छा भरली तुडुंब

सुटलाचं नाही पीळ
जळालाजरीही सुंभ
पर्वानसे परिवाराची
होई सत्तेविनाकुचुंब

पेरुन ठेवी आपणचं
खुर्ची खालती सुरुंग
सत्तेस्तव नात्यांमध्ये
स्वताचं बांधी तुरूंग

एक हाती अधिकार
लालसा आहे तुरूंब
विजय व्हावा माझा
सर्व मार्गांचे अवलंब

पराजय पदरीपडता
मनात उठे आगडोंब
आताअस्वस्थ होता
शोधत फिरेआगबंब

पुन्हासिंहासनासाठी
प्रयासकरी अविलंब
युक्ती क्लृप्ती पाहता
सकळा वाटेलं अचंब

व्यूहरचना करा पुन्हा
नव्याने करावा प्रारंभ
जोडा जोडा परिवारा
भावना विवश आरंभ

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

# कल्याणमध्ये उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नव्या प्रशासकीय इमारतीचे भव्य उद्घाटन



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१९, कल्याण :** उपप्रादेशिक परिवहन कार्यालय कल्याण येथील नव्याने उभारण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. या वेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, ठाणे पोलीस आयुक्त अशुतोष डुंबरे, परिमंडळ घटक ३ कल्याण उपायुक्त अतुल झेंडे, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, प्रादेशिक परिवहन अधिकारी (ठाणे) हेमांगीनी पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल आदी उपस्थित होते. या उद्घाटनप्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नागरिकांना दिलासा देत सांगितले की, या नव्या इमारतीमधून अधिक चांगल्या सेवा नागरिकांना दिल्या जातील. घरबसल्या सुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्न केले जात आहेत. सरकारी काम आणि सहा महिने थांब असे म्हणणाऱ्या काळाला आता विसरून जा. आता 'नो रीझन, ऑन द स्पॉट डिसीजन' हीच आमची नवी शैली असेल. शिंदे यांनी स्पष्ट केले की, या पुढे सर्व कामकाज हे अधिक स्मार्ट पद्धतीने आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पार पाडले जाईल. याद्वारे नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा मिळतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या वेळी उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या तसेच काही इमानदार रिक्षा चालकांचे ज्यांनी रिक्षात मिळालेले सोने मौल्यवान वस्तू ईमानदारीत परत त्या मालकाला पुन्हा परत दिल्या अश्या व्यक्तींचा सत्कार या वेळी करण्यात आला. ही इमारत केवळ एक प्रशासकीय केंद्र नसून नागरिकांसाठी तांत्रिक प्रगतीचे आणि जलदगती सेवा देणाऱ्या नवयुगाचे दार उघडणारे केंद्र ठरेल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनीही व्यक्त केला.

# जागतिक मधमाशी दिन

आज २० मे, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. अँतोन जोंसा या जगप्रसिद्ध मधुमक्षिका पालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी स्लोव्हनिया या देशातील गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांनी १७६६ मध्ये युरोपात पहीले मधमाशी पालन केंद्र सुरू केले. १७७१ मध्ये त्यांनी मधुमशीपालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ पासून २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून घोषित केला.

या दिवशी मधमाशांचे संवर्धन करण्यासह कीटकांचे संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली जाते. मधमाशी हा पर्यावरणातील अतिशय महत्वाचा घटक आहे. मधमाशी हे जीवसृष्टीला मिळालेले सर्वोत्तम वरदान आहे. मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते. मधमाशा इतर किटकांप्रमाणे एकट्या दुकट्या राहत नाही तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात.

मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत. तरीही मधमाशीपालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत उलट मधमाशांचे पोळे जाळून त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा



कल असतो. पूर्वी शेतात, बांधावर, आजूबाजूला सहज नजरेस पडणारी मधमाशांची पोळे आता दिसत नाही. मधासाठी पोळे जाळणे, कीटकनाशके फवारणे, मोबाईल टॉवर उभारणे, मधमाशांविषयी अज्ञान पसरवणे या कारणांमुळे मधमाशी सारखा उपयुक्त जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील मधमाशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. मधमाशांची शास्त्रिय माहिती घेऊन तिचे संगोपन करण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. पराग सिंचनामुळे शेती उत्पादनात वाढ होत असल्याने मध व मेन या बाबीपेक्षा उत्पादनातील वाढ हा महत्वाचा घटक मानून शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाला अग्रक्रम द्यायला हवा.

सरकारनेही याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करायला हवे. रोजगार निर्मितीला वाव असल्याने मधमाशी पालन हा पूरक उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मधमाशी ही आपल्यासाठी अतिशय महत्वाचे काम करते. मधमशांकडून शिकण्यासारखेही खूप आहे. समूहात राहून आदर्श जीवन कसे जगावे हे मधमाशांकडून शिकावे. दीर्घ कष्ट केल्याने मधासारखा गोड पदार्थ निर्माण करता येतो हे मधमाशांनी दाखवून दिले आहे. मधमाशी हा केवळ मानवासाठीच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. आपण सर्वांनी मधमाशी वाचवण्याचा पर्यायाने जीवसृष्टी वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तरच मधमाशी दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# खा.सोनवणेंनी मांडल्या शेतकऱ्यांच्या व्यथा; पीक कर्जाची मर्यादा वाढविण्याची बैठकीत मागणी

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खा.सोनवणे बनले शेतकऱ्यांचा आवाज



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१९, केज (बीड) :** जिल्ह्यातील बहुतेक भागात शेती खरडा-बर्डाची आहे. यात कधी अस्मानी तर कधी सुल्तानी संकट शेतकऱ्यांच्या मागे उभाच असतात. अशावेळी शेतकऱ्यांना पीककर्ज आवश्यक असते. आतापर्यंत शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंत पीककर्ज दिले जात असून त्याची मर्यादा वाढवून ता ५ लाखापर्यंत करावे, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली.

जिल्हा नियोजन समितीची बैठक सोमवार, दिनांक १९ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या सभागृहात संपन्न झाली. यावेळी पालकमंत्री ना. अजित पवार, मंत्री ना.पंकजा मुंडे, आ.प्रकाश सोळंके, आ.सुरेश धस, आ.धनंजय मुंडे, आ.संदीप क्षीरसागर, आ.विजयसिंह पंडीत, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील महत्वाच्या विषयाला हात घालत बीडसाठी रेल्वे हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. अहिल्यानगर ते परळी रेल्वेमार्गाचे काम सुरू आहे. परंतु मधल्या काळात रेल्वेचे रूळ अंथरण्याच्या कामासोबत विद्युत जोडणीचे काम त्याच वेगाने होणे आवश्यक होते. विद्युत जोडणीस होत असलेल्या विलंबामुळे रेल्वेची हायस्पीड चाचणी होऊनही रेल्वे बीड पर्यंत येऊ शकलेली नाही. दरम्यान, रेल्वे विभागातील ओव्हर ब्रिज, अंडर ब्रिज तयार करीत असताना त्यात अडचणी येतात. त्या सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. पालकमंत्री अजित पवार यांनीही यात लक्ष घातल्यास अनेक अडचणी सुटून रेल्वे कामाला हायस्पीड गती मिळेल, येणाऱ्या काळात बीडला रेल्वे येईल आणि जिल्हयाच्या विकासाला चालना मिळेल, असेही खा.सोनवणे म्हणाले.

### खा.सोनवणेंनी शब्द टाकला अन् दादांकडून होकार

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचे रात्रंदिवस काम सुरू आहे परंतु याचसोबत धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेची मागणी देखील पुढे आलेली आहे. आपण केंद्रात यासाठी आवश्यक पाठपुरावा करत आहोत, असे सांगत खा.सोनवणे यांनी धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेमार्ग प्रकल्पासाठी राज्यशासनाने अर्धा हिस्सा देण्यात यावा, अशी महत्वपूर्ण मागणी ही उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्याकडे केली. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी देखील ही मागणी मान्य केली.

### झेडपीच्या अतिरिक्त कारभाराच्या विषयावर चर्चा

जिल्हा परिषद प्रशासनात काही कर्मचारी प्रशासकिय बदल्यानंतरही अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली पुन्हा त्याच ठिकाणी पदभार घेतात. मागील दहा वर्षांपासून जिल्हा परिषदेत जवळपास ७७ कर्मचारी असेच काम आहेत. यामुळे अशा कर्मचाऱ्यांकडे असलेला पदभार काढून त्यांना मुळे ठिकाणी पाठवावे, अशी भुमिका ही खा.बजरंग सोनवणे यांनी मांडली. यावेळी या विषयावर अधिकाऱ्यांनी चर्चा करून कार्यवाही करू, असे सांगितले.

# धाराशिवकरांना 'एम्स'कडून मिळणार वैद्यकीय सेवा

## 'एम्स'सोबत शासकीय मेडिकल कॉलेज काम करणार : आमदार राणाजगजितसिंह पाटील

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१९, धाराशिव :** धाराशिवच्या शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयालास अखिल भारतीय आयुर्विमा संस्था अर्थात नागपूर एम्सच्या सहकार्याचा मार्ग आता सुकर झाला आहे. त्यामुळे धाराशिवकरांना आता 'एम्स'कडून अत्याधुनिक वैद्यकीय सेवा मिळणार आहेत. तसेच वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही एम्सच्या तंज्ञांकडून अद्ययावत वैद्यकीय शिक्षणाचे धडे मिळणार आहेत. नागपूर 'एम्स'आपल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासोबत काम करणार असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

वैद्यकीय क्षेत्रात देशात नावाजलेल्या एम्सचे मार्गदर्शन आता आपल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मिळणार आहे. त्याचबरोबर वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अद्ययावत आणि दर्जेदार वैद्यकीय शिक्षण देत धाराशिवकरांना 'एम्स'च्या तंज्ञांची वैद्यकीय सेवाही लाभणार आहे. नागपूर 'एम्स'चे कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. प्रशांत जोशी यांनी धाराशिवच्या शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अधिष्ठातांना दोन्ही संस्थांमधे अधिकृतपणे एकत्रित काम करण्या बाबत ठरलयाकगे पत्राद्वारे कळविले आहे. 'एम्स'चे तज्ञ धाराशिवच्या वैद्यकीय



महाविद्यालयात रुग्णसेवा व वैद्यकीय शैक्षणिक विकासासाठी 'हँड होल्डिंग'ची महत्वपूर्ण भूमिका पार पाडतील. या निर्णया मुळे 'एम्स'चे नागपूर आता वैद्यकीय महाविद्यालय धाराशिवसाठी रेफरल सेंटर म्हणून कार्य करणार आहे. महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन शैक्षणिक म ार्गदर्शनही उपलब्ध करून दिले जाणार आहे. तसेच जिल्ह्यातील रुग्णांना आता नागपूर येथे सुपर स्पेशालिटी आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहेत. नागपूर येथील 'एम्स' ही संस्था महाराष्ट्रातील अद्ययावत व आधुनिक उपचार पद्धतीने युक्त अशी एकमेव वैद्यकीय संस्था आहे. धाराशिव नागपूर दरम्यान उपलब्ध परिवहन, रेल्वे सेवा तसेच समृद्धी महाम ार्गामुळे दोन्ही शहरातील अंतरही आता कमी वेळेत गाठता येणार आहे. त्यामुळे अंतर रुग्ण सेवेसाठी ही बाब आणखी सोईस्कर ठरणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

हा महत्वपूर्ण आणि ऐतिहासिक सामंजस्य करार पूर्णत्वास जावा यासाठी आपले प्रयत्न सुरू होते.धाराशिवचे वैद्यकीय महाविद्यालय राज्यातील एक मॉडेल संस्था म्हणून नावारूपाला यावे यासाठी आपला सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. त्याअनुषंगाने नागपूर 'एम्स' महाविद्यालयाचा परिसर, बांधकाम, अध्यापन पद्धतीसह इत्थंभूत कामकाजाची माहिती घेण्यासाठी आपण आवर्जून डिसेंबर २०२२, डिसेंबर २०२४ अशी दोन वेळा या संस्थेला भेट दिली. धाराशिव वैद्यकीय महाविद्यालयाच्या तत्कालीन अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार तसेच इतर प्राध्यापक व सहकारीही आपल्यासोबत उपस्थित होते.

नागपूर 'एम्स'च्या धर्तीवर सर्व सोयीसुविधांनी युक्त असा अद्ययावत कॅम्पस, आधुनिक प्रयोगशाळा, आरएफआयडी लायब्ररी, संग्रहालय, ऑडिटोरीअम, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि उपहारगृह आदींचे आराखडे तयार करण्यात आले आहे. इमारतीच्या बांधकामासाठी शासनाने आता ४०३.८९ कोटी रुपयांचा निधीही उपलब्ध करून दिला आहे. काही दिवसातच इमारत बांधकामासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईल. नागपूर 'एम्स'सोबतच बारामती, सातारा येथील वैद्यकीय महाविद्यालयांचाही अभ्यास करून अधिकचे नियोजन सुरू असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नमूद केले.

### २२ मे रोजी 'एम्स'च्या तज्ञांचे पाहिले लेक्चर

'एम्स' नागपूरसारख्या वैद्यकीय क्षेत्रातील नावाजलेल्या संस्थेच्या मार्गदर्शनामुळे धाराशिवचे वैद्यकीय महाविद्यालय भविष्यात वैद्यकीय शिक्षण तसेच आरोग्यसेवेबाबत एक आदर्श वैद्यकीय संकुल म्हणून नावारूपाला येईल. ही संपूर्ण प्रक्रिया धाराशिवच्या वैद्यकीय आणि सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने एक निर्णायक पाऊल ठरणार आहे. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच जिल्ह्यातील रुग्णांनाही याची चांगली मदत होणार आहे.

२२ मे रोजी त्याची अधिकृत सुरुवात होत आहे. 'एम्स'चे प्राध्यापक दुरदर्शीप्रणालीच्या माध्यमातून डॉ. प्रथम ेश कांबळे 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मेंदू-संगणक : संवाद यंत्रणा, नव कल्पना, आव्हाने आणि भविष्यातील क्षितिजे' या विषयावर पाहिले लेक्चर घेणार आहेत. आपण केलेल्या नियोजनबद्ध पाठपुराव्याला यश आले आहे. आपल्या विनंतीला मान देऊन नागपूर 'एम्स'च्या तज्ञ आणि वरिष्ठ मंडळींनी सकारात्मकता दर्शवित या बाबी उत्स्फ ूर्तपणे मान्य केल्याबद्दल त्यांचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मन:पूर्वक आभार मानले आहेत.

# गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबवावी - पालकमंत्री देसाई

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, सातारा :** जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून हाती घेण्यात येणारी कामे दर्जेदार, वेळेत पूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार ही शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी महसूल प्रशासनाने आवश्यक सहभाग नोंदवावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. चालू वर्षात जिल्हा नियोजनचा ७४४ कोटी रुपये निधी मंजूर असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात नियोजन भवनात पार पडलेल्या सातारा जिल्हा नियोजन समितीच्या आढावा बैठकीत पालकमंत्री श्री. देसाई यांनी ही माहिती दिली. बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील (दूरदृष्य प्रणालीद्वारे), आमदार शशिकांत शिंदे, डॉ. अतुल भोसले, मनोज घोरपडे, सचिन पाटील, जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज, पुणे विभागीय आयुक्तालयाचे उपायुक्त (नियोजन) संजय मरकळे ,जिल्हा नियोजन अधिकारी शशिकांत माळी, सम ाज कल्याणचे सहायक आयुक्त सुनिल जाधव यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, जिल्ह्यात चार मंत्री असून जिल्हा वार्षिक योजनेच्या निधी व्यतिरिक्त जिल्ह्याच्या विकासासाठी विविध विभागांकडून अधिकाधिक निधी आणला जाईल. जलजीवन मिशनच्या कामांना कशी गती देता येईल यादृष्टीने कार्यवाही करावी. वनविभागाच्या हद्दीतील तलावासाठी १ हेक्टरच्या आतील भूसंपादनासाठी जलसंधारण विभागाने जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव सादर करावेत, असेही निर्दे श त्यांनी दिले. आमदार महोदयांच्या




मागणीनुसार साकव पुल बांधणे, स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र व माझी शाळा आदर्श शाळा या उपक्रमांसाठी जास्तीचा निधी ठेवण्यात आल्याचे जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी बैठकीत सांगितले.

चालू आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना ६४७ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजना ९५ कोटी आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्र २ कोटी ८ लाख असा एकूण ७४४ कोटी ८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याचे जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्ह्यासाठी २०२४-२५ आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजना ५७५ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजना ९५ कोटी आणि आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्र १ कोटी ६४ लाख असे एकूण ६७१ कोटी ६४ लाख रुपये निधी मंजूर झाला होता. हा संपूर्ण १०० निधी टक्के खर्च झाला असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. मौजे तळदेव(ता. महाबळेश्वर) येथील तळेश्वर देवस्थान मंदिर, मौजे कळंबे (ता. सातारा) येथील श्री भैरवनाथ मंदिर, मौजे. आंधळी (ता. माण) येथील सिद्धेश्वर महालक्ष्मी मंदिर, मौजे कवठे (ता. खंडाळा) येथील केदारेश्वर मंदिर या मंदिरांना 'क' वर्ग तिर्थक्षेत्र दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावांना जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यावेळी उपस्थित आमदार महोदयांनी विविध सूचना केल्या.

# थोडक्यात

## सुर्डी फाटा येथे एकात्मिक ऊस व्यवस्थापन व खरीप नियोजन कार्यशाळा संपन्न



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१९, केज (बीड) :** कृषी विभाग, नॅचरल शुगर रांजनी व स्पिक कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने माळेगाव, सुर्डी, मांगवडगाव, सोनेसांगवी या गावातील शेतकऱ्यांची सुर्डी फाटा (ता.केज) येथे सोमवार, दिनांक १९ मे २०२५ रोजी कार्यशाळा आयोजित करून एकात्मिक ऊस व्यवस्थापन व खरीप हंगामाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी कृषी सहाय्यक कमलाकर राऊत यांनी सोयाबीन पिकाचे विविध वाण, रासायनिक व जैविक बीज प्रक्रिये बाबत मार्गदर्शन केले. मंडळ कृषी अधिकारी दरेकर यांनी बियाणे उगवण क्षमता बाबत माहिती दिली, आत्माचे बीटीएम योगेश पाटील यांनी सोयाबीन कीड रोग व्यवस्थापन बाबत मार्गदर्शन केले. ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी हुमणी अळीचा जीवनक्रम समजावून सांगून या अळीमुळे होणारे नुकसान बाबत माहिती दिली तसेच मे महिन्यात अवकाळी पाऊस पडल्यामुळे कडुलिंबाच्या झाडांवर हुमणी अळीचे प्रौढ निदर्शनास येत असल्याने हुमणी अळी प्रतिबंधात्मक व्यवस्थापनासाठी प्रकाश सापळे, एरंड सापळे, कामगंध सापळे लावणे तसेच सोयाबीन पिकामधील पिवळा मोझॅक विषाणू आणि सूक्ष्म अन्नद्रव्य कमतरतेमुळे निर्माण होणारा पिवळसरपणा यामधील फरक आणि याचे व्यवस्थापन तसेच ऊस पिकामधील चाबुक काणी, गवताळ वाढ रोग आणि पोंगेमर, लोकरी मावा, पिठ्या ढेकूण व्यवस्थापन संदर्भात विस्तृतपणे मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे बेड तयार करून टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड करणे आणि शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करणे संदर्भात माहिती दिली. यावेळी कृषी पर्यवेक्षक नागेश येवले,किशोर फरकांडे, पत्रकार बळीराम लोकरे, प्रगतिशील शेतकरी बब्रुवान कणसे, नितीन गव्हाणे,वैभव भिसे,धनराज पवार यांच्यासह इतर शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मौजे ब्रम्हपुरी गोदावरी नदीच्या पात्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, नांदेड :** मौजे ब्रम्हपुरी येथील गोदावरी नदी पात्र परिसरात शांतता व सुव्यवस्था अबाधीत रहावी यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नदी पात्रातील परिसर प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून २० मे चे ६ वाजेपासून ते १९ जून २०२५ चे मध्यरात्री पर्यंत घोषित करण्यात आले आहे. त्याबाबत जिल्हा दंडाधिकारी कार्यालयाने आदेश निर्गमित केले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन वादग्रस्त जागा, ज्याची चतु:सिमा पूर्वेस वाजेगाव कोल्हापुरी बंधारा, पश्चिमेस नांदेड ते देगलूर कडे जाणाऱ्या रोडवरील जुना पूल, दक्षिणेस गोदावरीचे नदीचे पात्र आणि उत्तरेस चिल्ला/दर्गाची संरक्षण भिंत यामधील जागा २० मे २०२५ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते १९ जून २०२५ रोजीच्या मध्यरात्री पर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून जिल्हादंडाधिकारी यांनी घोषित केले आहे. हा आदेश शासकीय कर्तव्यावरील अधिकारी व कर्मचारी, एक खिडकी पथकातील अधिकाऱ्यांनी परवानगी दिलेल्या भाविकांना तसेच ज्यांना जिल्हाधिकारी नांदेड व पोलीस अधीक्षक नांदेड यांनी परवानगी दिली अशा व्यक्तींना लागू राहणार नाही.

## नांदेड शहरात २० तंबाखू विक्रेत्यांवर दंडात्मक कार्यवाही

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, नांदेड :** नांदेड शहरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची मोठ्या प्रम ाणात विक्री तसेच कोटपा २००३ कायद्याचे उल्लंघन होत असल्याबाबत मिळालेल्या माहितीनुसार जिल्हास्तरीय तंबाखू नियंत्रण पथकाने १९ मे २०२५ रोजी नांदेड शहरातील भाग्यनगर, तरोडा नाका व छत्रपती चौक इत्यादी ठिकाणी अचानक धाडी टाकून एकूण २० तंबाखू विक्रेत्यांकडून ७ हजार ७०० रुपये दंड आकारण्यात आला. ही कार्यवाही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या निर्देशनाखाली व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके व नोडल अधिकारी डॉ. हनमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात जिल्हा सल्लागार डॉ.शितल चातुरे, मानसशास्त्रज्ञ प्रकाश आहेर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते बालाजी गायकवाड, व केस रजिस्ट्री सहाय्यक सुनील तोटेवाड तसेच भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्सटेबल बालाजी पाटील व पोलीस कॉन्सटेबल पठाण उपस्थित होते. सार्वजनिक ठिकाणी तसेच शैक्षणिक अथवा शासकीय, निमशासकीय कार्यालयाच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाची विक्री अथवा सेवन किंवा साठवण होत असल्यास जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे तक्रार नोंदवून नांदेड जिल्हा तंबाखू मुक्त करण्याच्या या अभियानास सहकार्य करावे असे, आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर यांनी केले आहे.

## पशुसंवर्धन दिनानिमित्त रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहिमेचा शुभारंभ

### लसीकरण ३१ मे पर्यंत सुरु

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, नांदेड :** पशुसंवर्धन दिनानिमित्त दिनांक २० मे २०२५ रोजी रेबीज मुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग व नांदेड वाघाळा महानगरपालिका नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने श्वानांम ध्ये रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत नांदेड जिल्ह्यामध्ये सर्व पाळीव व भटक्या श्वानांना रेबीज प्रतिबंधक लस मोफत फक्त नोंदणी शुल्कामध्ये दिली जाणार आहे. हे लसीकरण मोहीम स्वरूपात ३१ मे पर्यंत सुरू राहणार आहे. नांदेड शहरामध्ये शासकीय जिल्हा पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय देगलूर नाका, महानगरपालिका नांदेड संचालित पशुवैद्यकीय दवाखाना अशोक नगर नांदेड येथे, पेट नेस्ट क्लिनिक शिवाजीनगर पोलीस स्टेशन जवळ, पॉज क्लिनिक श्याम टॉकीज जवळ, डॉक्टर अजेश शर्मा यांचे पेट क्लिनिक भाग्यनगर व डॉग वर्ल्ड स्टेडियम कॉम्प्लेक्स, नांदेड येथे लस उपलब्ध होणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये ही लस टोचली जाणार आहे. सर्व नागरिकांनी या मोहिमेचा फायदा घेऊन आपल्या श्वानाचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.